...S • HINGOLI

# भारतातील
# राजकीय व सामाजिक चळवळी

मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. आय. डी. पाटील
संपादक
प्रा. डॉ. आर. एन. शेवाळे
प्रा. पी. एम. सोनवणे



अथर्व

आदिवासी चळवळ


- आदिवासी चळवळ : राजकीय, ऐतिहासिक व ............ २३९
  सामाजिक विश्लेषण
  - प्रा. [illegible]ंद्र मुरलिधर घरडे, नगाव
- संयुक्त महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ आणि ............ २४४
  मुख्यमंत्र्यांची विकासात्मक भुमिका
  - प्रा. डॉ. शुभांगी राठी, भुसावळ - प्रा. दिलीप हरसिंग राठोड, पारोळा
- आदिमांची प्रेरणादायी चळचळ ............................ २५०
  - प्रा. सुरकुले अनिता सोमनाथ, पुणे
- आदिवासी चळवळ ........................................ २५३
  - भालेराव सुधाकर नारायण
- आदिवासी चळवळ ........................................ २५७
  - प्रा. बबन आमले, कन्नड
- नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी जीवन संघर्ष ............... २६२
  - प्रा. डॉ. एम.जी. मोरे, जाफ्राबाद
- आदिवासींनी इंग्रजांविरूद्ध केलेले उठाव आणि चळवळी.... २६६
  - डॉ. क्षिरसागर बी. एस., हिंगोली
- भारतातील आदिवासी चळवळ ............................ २७८
  - प्रा. डॉ. प्रमोद मनोहर पवार, अमळनेर
  - प्रा. तडवी जावेदखाँ याकुबखाँ, मुक्ताईनगर
- भारतातील आदीवासी चवळीचा अभ्यास .................. २८५
  - प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे, देवपूर
  - प्रा. अशोक सुखदेव राठोड, धडगाव
- भारतातील आदिवासीच्या समस्या आणि उपाययोजना ...... २९१
  - मोहन ओंकार बेलोकार
- भारतातील आदिवासी चळवळ (हक्क व अंमलबजावणी) ... २९६
  - प्रा. ढोली संदिप रामचंद्र, नाशिक


दलित चळवळ


- भारतातील दलित चळवळ ................................ ३०१
  - डॉ. सूर्यकांत माधवराव सांभाळकर, कन्नड





- महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ : ए
  - प्रा. प्रकाश मानसाराम सैनिवणे, मुक
  - प्रा. महेंद्रसिंग मंगलसिंग चव्हाण, मु
- दलित चळवळ.....................
  - डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे, नेरपर
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वर्गीय
  दलित कम्युनिष्ट चळवळ
  - प्रा. वाघमारे एच. टी., चांदोरी, जि.
- भारतातील दलित चळवळ .........
  - डॉ. ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे, नगा
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकप
  - परदेशी भगवान ईश्वरलाल, शिरपूर
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलि
  - प्रा. डॉ. रविंद्र पुंडलिक पाटील, न
- दलित महिलांची चळवळ .........
  - डॉ. सौ. शारदा गोविंदराव बंडे, पू
- दलित चळवळ एक बदलती दिशा .
  - प्रा. सौ. कांबळे सुनिता शंकरराव,
- महाराष्ट्रातील दलित चळवळ एक मा
  - प्रा. मगर एम. के., जाफ्राबाद जि.
- भारतातील दलित चळवळ .........
  - नारायण रामलाल उंबरे, जळगांव
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरोत्तर दलित
  - प्रा. हनुमंत भारत सरतापे, नवापूर
- दलित चळवळ - एक विश्लेषणात
  - प्रा. आर. एस. कोरडे, वरवट ब
- महाराष्ट्रातील दलीत चळवळ ......
  - प्रा. पवार बळीराम वसंतराव, कि
- दलित चळवळीत डॉ. बाबासाहेब
  - प्रा. कमलाकर शरद इंगळे, पाचो
  - प्रा. डॉ. के. जी. पोकळे, चौसा
  भारतातील राज


84

# आदिवासींनी इंग्रजांविरूद्ध केलेले उठाव आणि चळवळी

डॉ. क्षिरसागर बी.एस.
इतिहास विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

८५

**प्रस्तावना**

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. भारतात अनेक धर्म, वंश आणि संस्कृतिचे लोक राहतात. भारतामध्ये ६ हजार पेक्षाही जास्त जाती आणि उपजाती आहेत. जातींप्रमाणे भारतात आदिवासींच्या विविध जमाती आहेत. भारतातील आदिवासी जमातींना विचारवंतानी वेगवेगळ्या नावानी संबोधले आहे. एच. एच. रिजके, लेके, ग्रियर्सन, सोलर्ट, टेलेट्स, सेनविक, मार्टिन या मानवशास्त्रज्ञांनी व भारतीय समाजसुधारक ठक्कर बप्पा यांनी त्यांना आदिवासी शब्दाने संबोधिले आहे, तर बेन्सने वन्य जाती असे म्हटले आहे. प्रो. गुहा यांनी ऑस्ट्रिक भाषा बोलणाऱ्या लोकांबाबत अशाच आशयाचे निरिक्षण केले आहे. भारतातील जवळपास सर्वच राज्यात आदिवासी लोक राहत असलेले आढळून येते. इ. स. १९५० मध्ये भारतातील एकूण १४ राज्यात २१० आदिवासी जमाती अनूसूचित जमातीच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आल्या होत्या. इ. स.२००१ च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातीची संख्या वाढून ती ५५० झाली. भारतामध्ये आदिवासींची लोकसंख्या या जनगणनेनूसार ८.४ कोटी आहे. म्हणजेच भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.२०% लोकसंख्या आदिवासींची आहे. या लोकसंख्येच्या आधारावरच आदिवासी जमातींना ०७% आरक्षण भारतीय संविधानाने दिले आहे.

आदिवासी समाज हा प्रामुख्याने जंगल, पर्वतमय प्रदेश, दऱ्या-खोऱ्यात वास्तव्य करणारा समाज होय. त्यांच्या जीवनपद्धतीवर प्राचीन काळापासून कोणतेही बंधने नव्हती. परंतु जेव्हा भारतामध्ये ब्रिटीश सत्ता स्थापन झाली त्यानंतर मात्र आदिवासींच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली. त्यांचे जंगल स्वातंत्र्य हिरावणे, जमीनदार आणि सावकारांनी इंग्रजांच्या सहकार्याने भारतातील आदिवासी समुहातील जमातींचे शोषण केले. या शोषणाविरूद्ध आणि सुरक्षितेची हमी मिळविण्यासाठी भारतातील आदिवासींनी इंग्रजांविरूद्ध चळवळी उभ्या केल्या. या चळवळीमध्ये बिहार चेरो, छोटा नागपूर विभागातील संथाल जमात, राजस्थानातील भिल्ल, ओरिसातील कोल्हान प्रदेशातील चळवळ, पूर्व भारतातील सिंगपो, मिशिमी, लुशाई, ऊला, खम्या, खासी, नागा, मिझो यांनीही इंग्रजांना कडाडून विरोध केला. त्याचबरोबर संथाल जमातीनेही गंगा नारायण कान्हू सिद्धा याच्या नेतृत्वाखाली चळवळ उभी केली. तर भिल्लांनी कुवर जीवो वसावाच्या नेतृत्वाखाली लढे दिलीत. ओरिसामध्ये खोंड जमातीने चक्रबोशाई मार्फत जमीनदार व इंग्रजांना विरोध केला. यानंतर जुआंग, सगपरा चळवळी उभ्या झाल्या. आंध्रामध्ये पहाडी ही चळवळ, बिहारमधील बिरसा मुंडा चळवळ तर देशभर गाजली. आदिलाबाद जिल्ह्यातील गोंड आणि कोलाम जमातीची चळवळ भीमू कुमरा गोंड या नेत्याच्या नेतृत्वाखाली निर्माण झाली. संपूर्ण भारतभर जेथे-जेथे आदिवासींच्या हक्कावर बंधने आली तेथे आदिवासींनी इंग्रजांविरोधात चळवळी उभ्या केल्या.

**आदिवासी कोणास म्हणावे**

प्राचीन काळापासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे लोक म्हणजे आदिवासी होय. इंग्रजीमधील (Tribes) या शब्दाचा अर्थ जमात किंवा जमाती असा होतो. ठक्कर बाप्पा आणि डॉ. व्हेरियर एल्विन यांनी आदिवासींना Abcriginal याचा अर्थ मुळचे निवासी असा होतो. आदिवासी हे जंगलात अथवा डोंगराळ भागात राहतात म्हणून त्यांना वन्यजमाती किंवा गिरीजन जमाती म्हटले जाते. परंतु खऱ्या अर्थाने देशाचे मुळचे निवासी मुलनिवासी आदिवासी आहेत.

इ.स.१९३१ च्या लोकसंख्या अहवालात आदिवासींना आदिम जमाती म्हटले गेले. भारत सरकार अधिनियम इ. स. १९३५ मध्ये आदिवासी जमातीच्या लोकसंख्येला मागास जमातीचे नाव दिले गेले. तर इ.स.१९४१ च्या लोकसंख्या अहवालात त्यांना केवळ जमाती म्हटले गेले. भारतीय संविधानात आदिवासींना अनुसूचित (Scheduled Tribes) असे संबोधले आहे. सर्वसाधारणपणे डोंगराळ प्रदेशात आणि जंगलामध्ये वास्तव्य करणाऱ्या, तसेच आधूनिक संस्कृती व जीवनपद्धती पासून अलिप्त आहेत अशा लोकांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात आला आहे. यामुळे आदिवासीं समुहामध्ये अंर्तभूत सर्व जातींना अनुसूचित जमाती या नावाने ओळखले जाऊ लागले.

आदिवासी किंवा जमातीचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता काही समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याख्यांचा आधार घेणे गरजेचे आहे. डॉ. रिव्हर्सच्या मते, ''जमात किंवा आदिवासी हा एक सरळ साधा सामाजिक समूह आहे. ज्यातील सदस्य एका समान बोलीभाषेचा वापर करतात व युद्ध वगैरे सारख्या उद्देशपूर्तीकरिता एकत्रित कार्य करतात.'' तर गिलीन आणि गिलीनएच्या मते, ''आदिवासी समाज हा एका विशिष्ठ भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एक समान बोली भाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांचे एकत्रीकरण आहे.''

## आदिवासींच्या चळवळी:

आदिवासी समाज सभ्यतेच्या क्षेत्रापासून दूर जंगलात, पहाडांच्या सान्निध्यात, दऱ्यात वास्तव्य करतो. त्यामुळे त्यांच्यात अंधश्रद्धा, निरक्षरता, बेकारी, दारिद्र्य, अस्वच्छ राहणीमान, कर्जबाजारीपणा प्रामुख्याने दिसून येतो. त्याचबरोबर इतर वर्गीयांच्या शोषणामध्ये आदिवासी समाज अडकून पडलेला आहे. आपणच जंगलाचा राजा आहे, अशी त्यांची धारणा होती परंतु अनेक लोकांनी स्वार्थासाठी त्यांच्यावर अत्याचार व अन्याय केले.

आदिवासींच्या शोषणाची सुरूवात ही ब्रिटीश शासनव्यवस्थेत झाली. इंग्रजांनी केलेले कायदे, धोरणे यांचा आदिवासींच्या जीवनावर विपरीत परिणाम झाला. त्याचबरोबर जमीनदार, सावकार व ठेकेदार यांच्याही अत्याचाराला प्रतिकार म्हणून आदिवासींनी सामुहिकरित्या विरोध केला. या प्रयत्नातूनच आदिवासींच्या चळवळी व उठावांना सुरूवात झाली. आपले अस्तित्व टिकविण्याच्या उद्देशाने त्यांनी ब्रिटीशांना विरोध केला.

### आदिवासींच्या चळवळीचे उद्दिष्टे:

ब्रिटीश शासन भारतात सुरू होताच आदिवासींच्या स्वातंत्र्यावर बंधणे आलीत. आदिवासींचे प्रादेशिक, भौगोलिक अधिकार बांधल्या गेलेत. ब्रिटीशांच्या अन्याय, अत्याचारास विरोध करण्यासाठी आदिवासींनी ब्रिटीशांविरूद्ध लढा उभारला, बऱ्याच जमातींनी शस्त्राने इंग्रजांचा प्रतिकार केला. वेठबिगारी पद्धत नष्ट करणे, शेतमजुरी वाढवून देणे, कर्जातून मुक्ती मिळविणे, जंगलाचे हक्क मिळविणे, आपल्या जमिनीवर होणारे आक्रमण थोपविणे, महसूल कमी करण्यासाठी, सर्वात महत्त्वाचे म्हणजे जगण्याचा हक्क मिळविणे, मुंडा राज स्थापन करणे यासाठी आदिवासी समाजाने इंग्रजांविरोधात अनेक चळवळी व सशस्त्र उठाव केले.

### आदिवासी चळवळींची कारणे:

कोणत्याही चळवळी, उठाव एकाएकी होत नसतात, त्यासाठी विशिष्ट घटक किंवा कारणे जबाबदार असतात. इंग्रजांच्या आगमनापूर्वी आदिवासी समाजात स्थानिक स्वशासन होते. त्यांच्यावर बाहेरच्या शासकाचा दबाव किंवा नियंत्रण नव्हते. परंतू ब्रिटीशकालीन शासनव्यवस्थेत आदिवासींची स्थानिक स्वायत्तता समाप्त झाली. इंग्रजांचे कायदे आदिवासींना असह्य वाटू लागले. त्या कायद्यांना विरोध म्हणूनच त्यांनी उठाव केले. ब्रिटीश शासन, व्यापारी, सावकार, जमीनदार आणि ठेकेदार यांनी आदिवासींच्या अज्ञान व भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांचे आर्थिक शोषण केले. त्यामुळे आदिवासींमध्ये असंतोष निर्माण झाला. ब्रिटीश काळात इंग्रजी मिशनऱ्यांनी आदिवासींना विशेष प्रलोभणे देऊन त्यांना धर्मांतरित केले. परंतु ब्रिटीशांचे वास्तविक धोरण लक्षात आल्याने धर्मप्रसार कार्याला विरोध म्हणून आदिवासींनी इंग्रजी सत्तेविरोधात उठाव केले. वनसंपत्ती ही आदिवासींची मालकी असते. परंतु शासनाच्या वनधोरणाने आदिवासींचे जंगल संपत्तीवरील अधिकार नष्ट झाले त्यामुळे आदिवासींनी जंगल संपत्तीच्या अधिकारासाठी विद्रोह केला. [illegible] लोकांच्या अत्याचारामुळे आदिवासींना आपल्या समाजातील काही उणिवा लक्षात आल्या. अधिकारपूर्ण जीवन जगण्यासाठी ते संघटित झाले. या संघटनेतून त्यांच्या चळवळीला सुरूवात झाली.

### बिरसा मुंडा चळवळ:

बिरसा मुंडा या नेत्याच्या नावाने या चळवळीला ओळखले जाते. तत्कालीन बिहार प्रदेशातील छोटा नागपूर भागातील मुंडा लोकांनी 'स्व' स्वाभिमानासाठी हि चळवळ सुरू केली होती.

बिरसा मुंडा यांचा जन्म हलीहातु नावाच्या गावामध्ये एका गरीब कुटुंबामध्ये झाला. दारिद्र्यामुळे बिरसाचे वडिल सुगना मुंडा यांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला. बिरसाचे शिक्षण ख्रिश्चन मिशनरीतून सुरू झाले. हे शिक्षण घेत असताना बिरसाच्या मनात ख्रिश्चन मिशनरी आणि इंग्रजाविरोधी घृणा निर्माण झाली.

इंग्रजी सत्तेपूर्वी मुंडा आदिवासींची स्वतंत्र सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था होती. त्यांचे अंतर्गत वाद पट्टी पंचायतीमार्फत सोडविले जात. इंग्रजांची राजवट आल्यानंतर पोलिस विभाग, न्यायालये स्थापन झाली. नवीन पद्धतीने महसुल गोळा होऊ लागला. त्यामुळे आदिवासींची परंपरागत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था पूर्णतः नष्ट झाली. छोटा नागपूर भागातील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी सावकार, जमिनदारांनी हडपल्याने मालक असलेले आदिवासी स्वतःच्या जमीनीवर नोकर म्हणून राबू लागले इंग्रजांच्या नव्या व्यवस्थेचा परिणाम मुंडा आदिवासींवर पडला. जगायचे कसे हा मुळ प्रश्न त्यांच्यापुढे होता. इंग्रजांच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी इ. स. १७८९ मध्ये मुंडा आदिवासींनी उठाव केला. इ. स. १८५८ मध्ये आदिवासींनी आपल्या जमीन अधिकाराच्या रक्षणार्थ सरदारी चळवळ सुरू केली. या चळवळीचा परिणाम बिरसा मुंडावर होऊन, बिरसाने आपल्या कुटुंबियासह ख्रिश्चन धर्माचा त्याग केला.

ख्रिश्चन मिशनऱ्या विरूद्ध बिरसा सरदारी चळवळीत सक्रिय झाला. या चळवळीत सहभागी होण्यासाठी त्याने गावोगावी जाऊन संघटन केले. यावेळी बिरसाची आर्थिक स्थिती अतिशय वाईट होती. कुटुंबातील सदस्यांची भूक भागविण्यासाठी त्याने प्रेताच्या थडग्यावरील दागीने विकले. त्यामुळे लोक त्याला पागू बिरसा (वेडा बिरसा) असे म्हणू लागले. पुढे बिरसा जंगलात निघून गेला व





PRINCIPAL

### पश्चिम भारतातील आदिवासींच्या चळवळी

दक्षिणेकडील शक्तिशाली म्हैसूरच्या टिपू सुलतानाचे राज्य नष्ट करून सर्व दक्षिण भारतावर इंग्रजांनी ताबा मिळविला. पश्चिम भारतावर मराठ्यांची सत्ता होती; परंतु १९ व्या शतकापर्यंत मराठ्यांनाही इंग्रजांनी आपल्या अधीन केले होते. इ.स. १८१८ ला पेशवाई नष्ट झाली. पेशवाई नष्ट होताच संपूर्ण पश्चिम भारतही इंग्रजांच्या ताब्यात आला. पश्चिम भारतातही अनेक नामवंत सरदारांनी, आदिवासींनी व शेतकऱ्यांनी इंग्रजांविरोधात उठाव केले.

महाराष्ट्रामध्ये जोपर्यंत मराठी सत्ता अस्तित्वात होती, तोपर्यंत रामोशांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात राजसत्तेचा हस्तक्षेप नव्हता; परंतु पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांनी शेतकऱ्यांबरोबरच आदिवासींवरही नव-नवे कर आकारले. हलाखीचे जीवन जगत असलेल्या रामोशी या जमातीला कर देणे असह्य झाले. दुखावलेल्या रामोशी या जमातीचे नेतृत्व उमाजी नाईकांनी करून इंग्रज सत्तेला आव्हान दिले.

उमाजी नाईक व त्याचा सहकारी बापू त्रिंबकजी सावंत यांनी इंग्रजांना महसूल गोळा करण्यास मज्जाव केला. शिवाय जे अधिकारी महसूल गोळा करण्यास इंग्रजांना मदत करत, त्यांच्यावर उमाजी नाईकांनी इ.स. १८२६ ते इ.स. १८२९ या काळात हल्ले केले. साताऱ्याजवळच्या प्रदेशात अनेक ठिकाणी उमाजीने लुटालुट केली. या धावपळीच्या काळात शेवटी उमाजी नाईक इंग्रजांच्या हाती लागला; परंतु उमाजी नाईकला प्रचंड लोकांचा पाठींबा असल्याने इंग्रजांनी रामोशांसोबत तडजोडीने प्रश्न सोडवून अनेकांच्या जमिनी परत केल्या तर काहींना पोलिस दलाच्या नोकरीत सामावून घेतले.

भिल्ल व कोळी जमाती सह्याद्रीच्या पर्वतीय प्रदेशात राहत असे. ब्रिटिश शासन भिल्ल व कोळ्यांच्या आर्थिक दुरवस्थेचे प्रतीक होते. यामुळे भिल्लांनी व कोळ्यांनी इंग्रजांविरूद्ध शस्त्र उचलले. इ.स. १८२४ ते इ.स. १८५० या काळात अनेक उठाव झाले. ओखामंडलच्या वाघेलांनीही इंग्रजांना प्रतिकार करून शस्त्र हाती घेतले.

### मध्य भारतातील आदिवासी चळवळ

मध्य भारतात प्रामुख्याने गोंड व भिल्ल या आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. आपल्या अस्तित्वासाठी त्यांनी इंग्रजांविरूद्ध चळवळी उभी केल्या.

गोंड या आदिवासी जमातीने इ.स. १८५७ च्या उठावात जमीनदारांमार्फत सहभाग घेतला होता. पुढे इ.स. १९४० ला गोंडानी आपल्या जंगलसंबंधीच्या अधिकारावर होणाऱ्या अतिक्रमणाबाबत प्रतिकात्मक भावना व्यक्त करून ब्रिटिशांविरोधात बंड केले. कुमरा भीमू याने गोंड जमातीच्या लोकांना एकत्रित करून इंग्रजांपुढे गोंडाची शिष्टाई केली. तरीही आदिवासींवर होणारे अत्याचार कमी झाले नाही. उलट ब्रिटिशांनी कुमरा भीमू व त्याच्या साथीदारांवर कारवाई सुरू केली. यामुळे कुमरा भीमूच्या नेतृत्वाखाली गोंड आदिवासी लोक इंग्रजांना विरोध करण्यासाठी शस्त्रानीशी तयार झाले. त्यांनी पोलीसांवर हल्ला केला. या हल्ल्यात कुमरा भीमू व त्याचे साथीदार शहीद झाले. आजही आदिलाबाद जिल्ह्यात (आंध्र प्रदेश) कुमरा भीमूला येथील आदिवासी समाज शहिद कुमरा भीमू या नावाने ओळखतात.

पुढे गोंड जमातीच्या नावाने त्या चळवळीने त्यांना अंदेश हिंदूकरण होते. इ.स. १९२९ मध्ये भाऊसिंग आणि राजगी यांनी सुधारणावादी चळवळीतून गोंड जमातीतील मद्यपान रोखण्यावर भर दिला.

आदिवासी चळवळीमध्ये भिल्ल चळवळ महत्त्वाची चळवळ मानली जाते. हिमालयापासून पश्चिम घाटापर्यंतच्या भौगोलिक प्रदेशामध्ये भिल्लांचे वास्तव्य दिसते. या जमातीचे लोक शेतीबरोबरच वनसंपत्तीवर आपल्या उपजिविका करतात. परंतु जेव्हा जमीनदार, सावकार, ठेकेदार व इंग्रजी अधिकारी यांनी भिल्लांवर अत्याचार करण्यास सुरूवात केली. तेव्हापासून भिल्लांनी या अत्याचारास प्रतिकार करण्यासाठी चळवळ उभी केली.

ब्रिटिश अधिकारी व सरंजामदार भिल्ल कुटुंबावर अत्याचार करीत. भिल्ल स्त्रियांना छेडणे, शेतीवर ताबा मिळविणे, गुलाम बनविणे इ. मार्फत भिल्ल भरडले जाई. यामुळे भिल्लांनी इंग्रजांच्या विरोधात लढा देण्याचे ठरविले. इ.स. १८१७ मध्ये भिल्लांनी खानदेशमध्ये लुटमार करण्यास सुरूवात केली. हा विद्रोह दडपण्यासाठी इंग्रजांनी पेशव्यांकरवी सैन्य पाठविले. परंतु तरीही भिल्लांना रोखणे इंग्रजांना शक्य झाले नाही. भिल्लांना अन्नधान्य न पोहचणे ही व्यवस्था इंग्रजांनी केली. तेव्हा भिल्लांनी इ.स. १८१९ मध्ये इंग्रजांच्या चौकींना घेरून ब्रिटिशांना हाकलण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अनेक भिल्ल हौतात्मे झाले. इ.स. १८२० ला पुन्हा भिल्लांनी उठाव केला. ब्रिटिशांनी भिल्लांच्या वस्तींना आगी लावल्या, त्यांच्या हत्या केल्या. परंतू भिल्ल नमले नाहीत. इ.स. १८३१ ते १८५२ या काळातही भिल्ल - इंग्रज लढा चालूच होता. भिल्लांची चळवळ ही अस्तित्वासाठी होती. आपल्या जमीनीचे आपणच मालक आहोत आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचार आम्ही सहन करणार नाही, यासाठी हा त्यांचा लढा होता. आपल्या आंदोलनाद्वारे भिल्लांनी इंग्रजांना आपले संघठन, शक्ती, सामर्थ्य दाखविले. यानंतर गोंड जमातीसारखी सुधारवादी चळवळ मध्यप्रदेश आणि गुजरातमध्ये भिल्लांनी केली. भिल्लांमधील गोविंदतीरी, भूलिया महाराज, मोतीलाल तेजादत, मास्तर तालेश्वर दयाल, लसोटिया, विश्वनाथ यांनी धार्मिक सुधारणेसाठी अनेक चळवळी





PRINCIPAL
... COLLEGE, HINGOLI

ब्रिटिश सत्तेची स्थापना भारतात झाल्यानंतर इंग्रजांनी महाराष्ट्रामधील भिल्ल, गोंड, महादेव कोळी या आदिवासी जमातीचे हक्क हिरावून घेतले, त्यांच्यावर अनेक बंधने लादली. यामुळे या जमातींनी इंग्रजांविरूद्ध बंड पुकारले. भिल्ल आणि महादेव कोळी या जमातीने नाशिक जिल्ह्यातील नांदगावजवळ मांडवद येथे इ.स. १८३० मध्ये पहिला उठाव केला. या चवळीचे नेतृत्व रामजी भांगरा आणि रामा किरवा या महादेव कोळी जमातीच्या नेत्यांनी केले. या चळवळीचे लोण महाराष्ट्रभर पसरले. इ.स. १८३० मध्ये पुणे जिल्ह्यातील जून्नर प्रांतात भाऊ खरेल, चिमणाची दरबारे आणि जाधव यांच्या नेतृत्वाखाली दूसरा उठाव झाला. यामध्ये ५४ महादेव कोळी लोकांचा मृत्यू झाला. अहमदनगरमधिल अकोलनेरात रतनगडच्या परिसरात रामजी भांगरे यानेही इंग्रजाविरूद्ध चळवळ उभी केली. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी इंग्रजांनी कॅप्टन मॅकिनोशला पाठवून राघोजी भांगरे यास बंदी बनविण्यात आले. दिनांक २ मे १८४८ मध्ये त्याला ठाणे येथे फाशी देण्यात आली. अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील भिल्ल जमातीने भागोजी नायकाच्या नेतृत्वाखाली इंग्रजांना विरोध म्हणून ब्रिटीश खजिने लुटणे, सैन्याचे नुकसान करणे, जमीनीवर हक्क निर्माण करणे या स्वरूपाचे कार्य केले. भागोजीने तर हातोहातच्या लढाईत कॅप्टन हेन्ड्री आणि कॅप्टन नुताल यांना माघार घेण्यास भाग पाडले. शेवटी १८५९ मध्ये मेजर फ्रँकसाचर सोबत लढता-लढता भागोजी नायक मारला गेल्याने ही चळवळ मंदावली. यानंतर सातपूडा परिसरातील उमेद बसावा या भिल्ल नेत्याच्या नेतृत्वाखाली पाच हजार भिल्ल एकत्र येऊन स्थानिक आर्मी स्थापन केली. यामुळे इंग्रजांनी वाटाघाटी करून भिल्लांना काही हक्क प्रदान केले.

इंग्रजांबरोबर आदिवासी समाजाचे शोषण सावकारही करीत म्हणून पुणे जिल्ह्यात १८७४ मध्ये होण्या केंगले याने महादेव कोळी जमातीच्या लोकांना एकत्रित करून सावकारांवर दरारा निर्माण केला. यामुळे इंग्रजांनी १८७६ मध्ये होण्या केंगलेला पकडून फाशीची शिक्षा दिली. दुष्काळमय स्थितीत सावकार आदिवासीच्या जमिनी हडपत या शोषणाविरूद्ध तरूण आदिवासींनी चळवळ उभी केली. या चळवळीमध्ये कोंडा नवले, बालू पिचड, ढवळा माकरे, सत्तु मराडी यांचा सहभाग होता. या सर्व चळवळी इंग्रजांनी क्रुरपणे दडपून टाकल्या.

**सारांश:**

इ.स. १७६० पासून इंग्रजी सत्तेच्या विरोधात अनेक उठाव झाले. यामध्ये आदिवासींचा मोठा वाटा आहे. हे सर्व उठाव इंग्रजांनी लष्कराच्या मदतीने, मोसावी लागली. १८५७ च्या उठावाची व्याप्ती मात्र भारतभर होती. या उठावाने इंग्रजी सत्ता हादरून गेली व ब्रिटिशांना कंपनी सरकार बरखास्त करून भारताचा कारभार पार्लमेंटच्या हाती सोपवावा लागला. इ.स. १८५८ ला राणीचा जाहिरनामा प्रसिद्ध होऊन भारतीय संस्थानिक, राजे-रजवाडे व आदिवासी जमातींना अनेक सवलती देण्यात आल्या. इ.स. १८५८ ला इस्ट इंडिया कंपनीचा अस्त होऊन भारतावर प्रत्यक्ष ब्रिटीश पार्लमेंटची सत्ता प्रस्थापीत झाली. परंतू इंग्रजी सत्तेचे शोषण थांबले नाही. यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींनी इंग्रजांना प्रतिकार करण्याचे सत्र चालूच ठेवले.

**संदर्भ ग्रंथ:**


१. Dr. Rivers - Races and Culture of India.
२. Gillin And gillin - Cultural Sociololgy
३. डॉ. दा. धो.काचोळे - आदिवासी समाजशास्त्र
४. डॉ. दा. धो.काचोळे - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र
५. डॉ. श्रीकांत गायकवाड - भारतातील सामाजिक चळवळी
६. डॉ. प्रदिप आगलावे - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र
७. डॉ. प्रदिप आगलावे - समाजशास्त्र : संकल्पना आणि संरचना
८. डॉ. एस जी देवगावकर - महाराष्ट्रातील निवउक जाती
९. डॉ. राजेंद्रकुमार शर्मा - ग्रामीण समाजशास्त्र
१०. डॉ. डी एस मनवर - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या
११. डॉ. घायाळ एस पी - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र






PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

HINGOLI